जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक २०३ | सोमवार, १६ फेब्रुवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210







## संक्षिप्त


### पुणे-सातारा रस्त्यावरील लॉजवर छापा

**पुणे, ता. १५ :** पुणेसातारा रस्त्यावरील एका लॉजवर गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने छापा टाकत वेश्याव्यवसाय प्रकरणात दलाल महिलेसह तिघांना अटक केली. या कारवाईत एका अल्पवयीन युवतीला पोलिसांनी ताब्यात घेतले. अटक करण्यात आलेल्यांमध्ये वर्षा शंकर शिरसाठी, अनिल मदन जेधे आणि जीवन प्रमोद इंगोले यांचा समावेश आहे. आरोपींविरोधात सहकार नगर पोलीस ठाणे येथे पीटा व पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुणे-सातारा रस्त्यावरील साई लॉजमध्ये एका युवतीला संशयित आरोपी दलाल शिरसाठी, जेधे यांनी आणले होते. अल्पवयीन युवतीला पैशांचे आमिष दाखवून तिला वेश्या व्यवसायास प्रवृत्त केले जात असल्याची महिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने तेथे छापा टाकला. पोलिसांनी लॉजमधून एका अल्पवयीन युवतीला ताब्यात घेतले. पैशांचे आमिष दाखवून युवतीला वेश्याव्यवसायास प्रवृत्त केल्याची माहिती मिळताच पोलिसांनी ही कारवाई केली.

# पोलिसांच्या हद्दीच्या वादातून मृतदेहाची तब्बल ४ तास हेळसांड

## कायद्याचे रक्षकच माणुसकी विसरलेत का? संतप्त नागरिकांचा सवाल

**लोणी काळभोर, ता. १५ :** पुणे शहर पोलीस दलातील लोणी काळभोर व वाघोली पोलीस ठाण्याचा हद्दीच्या वादामुळे एका तरुणाच्या मृतदेहाची तब्बल चार तास हेळसांड झाल्याची धक्कादायक घटना रविवारी (ता. १५) सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली आहे. या घटनेमुळे पोलीस प्रशासनाचा भोंगळ व असंवेदनशील कारभार चव्हाट्यावर आला असून, कायद्याचे रक्षकच माणुसकी विसरले की काय? असा संतप्त सवाल नागरिकांतून केला जात आहे.



महावीर बाळासाहेब गुणवरे (वय ३३, रा. राजवी पार्क, शिवरोड, केसनंद, ता. हवेली) असे मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव असून, ते पुणे महापालिकेत खाजगी कर्मचारी म्हणून कार्यरत होते. रविवारी पहाटे साडेतीनच्या सुमारास गुणवरे यांच्या छातीत तीव्र वेदना सुरू झाल्यानंतर नातेवाइकांनी त्यांना तातडीने शाश्वत हॉस्पिटल येथे दाखल केले.

प्राथमिक उपचारांनंतर पुढील उपचारासाठी त्यांना विश्वराज हॉस्पिटल येथे हलविण्यात आले. मात्र सकाळी सहाच्या सुमारास डॉक्टरांनी उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. यानंतर हॉस्पिटल प्रशासनाने एमएलसी लोणी काळभोर पोलिसांना दिली. मात्र ही घटना आमच्या हद्दीत येत नाही, असे सांगत लोणी काळभोर पोलिसांनी एमएलसी थेट वाघोली पोलिसांकडे पाठवण्यास सांगितले. इथूनच सुरू झाला सरकारी संवेदनशून्यतेचा घृणास्पद खेळ!

> पुणे शहर पोलीस दलाच्या हद्दीत मृत्यू झाल्यानंतर कोणतेही स्थानिक पोलीस ठाणे तेथे जाऊन पंचनामा करणे, मृतदेह ताब्यात घेणे, शवविच्छेदणासाठी घेऊन जाऊन पुढील कार्यवाही करू शकतो. परंतु, पोलिसांनी का केले नाही ते चेक करते?
> - **अनुराधा उदमले,** सहायक पोलीस आयुक्त, पुणे शहर

नातेवाईक व नागरिकांनी जाब विचारल्यानंतर लोणी काळभोर पोलिसांनी थेऊर चौकीमधून एक हवालदार पाठवून दिला, आणि तो ताबडतोब रुग्णालयात दाखल झाला. व त्यांनी एमएलसी करण्याचे काम सुरु केले. मात्र वाघोली पोलीस तब्बल चार तास हॉस्पिटलमध्ये फिरकलेच नाहीत. उलट आणखी ४५ मिनिटे लागतील अशी उत्तरे देत वेळकाढूपणा सुरू राहिला. या काळात मृतदेह हॉस्पिटलमध्येच पडून होता आणि कुटुंबीय अक्षरशः अश्रू ढाळत उभे होते. एका तरुणाचा जीव गेल्यानंतरही पोलीस ठाण्यांच्या हद्दीचा वाद सुरू राहतो, ही बाब अत्यंत लाजिरवाणी आणि अमानवी आहे. कायदा-सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी असलेली यंत्रणा इतकी निष्क्रिय व असंवेदनशील कशी होऊ शकते, असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.

जर केवळ हद्दीच्या वादामुळे मृतदेहाची पाच तास हेळसांड होत असेल, तर सर्वसामान्य नागरिकांनी न्यायाची अपेक्षा तरी कुणाकडून करायची? संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची तातडीने चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी आता नागरिकांतून होत आहे.




# राज्यभर एटीएसचे थेट सर्च ऑपरेशन; २१ ठिकाणी छापे

**पुणे, ता. १५ :** राज्यात दहशतवादी कारवायांचे धागेदोरे उलगडण्याच्या दिशेने एटीएसने रविवारी पहाटेपासून मोठी समन्वयित कारवाई सुरू केली आहे. पूर्व विदर्भापासून पश्चिम महाराष्ट्रापर्यंत तब्बल २१ ठिकाणी एकाच वेळी छापेमारी करत संशयित ठिकाणांची झडती घेण्यात येत आहे.

या धडक मोहिमेत यवतमाळ जिल्ह्यातील पुसाद आणि उमरखेड परिसरातील तब्बल १४ ठिकाणी तपास सुरू असून, अहिल्यानगर येथे ७ ठिकाणी छापे टाकण्यात आले आहेत. सकाळपासून सुरू असलेल्या या कारवाईत अनेक संशयितांना ताब्यात घेऊन सखोल चौकशी केली जात असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

एटीएसकडे काही तरुण दहशतवादी विचारसरणीच्या संपर्कात असल्याचे ठोस इनपुट प्राप्त झाल्यानंतर ही कारवाई हाती घेण्यात आली. सोशल मीडियाच्या माध्यमातून कट्टर विचारांचा प्रसार, युवकांचे ब्रेनवॉशिंग आणि संभाव्य नेटवर्क उभारणीचे संकेत मिळाल्याने एटीएसने अत्यंत गोपनीय पद्धतीने हे सर्च ऑपरेशन आखले होते.

दरम्यान, अहिल्यानगर शहरातील मुकुंदनगर परिसरात मध्यरात्री एटीएसचे पथक दाखल झाले. नागरिकांची शांतपणे चौकशी करत संशयित घरांची झडती घेण्यात आली. कोणताही गोंधळ होऊ न देता संपूर्ण कारवाई गुप्त ठेवण्यात आली होती. मागील काही वर्षांत या भागात समाजात तेढ निर्माण करण्याचे प्रयत्न, आक्षेपार्ह घोषणांचे प्रकार आणि युवकांना भडकवण्याच्या घटना चर्चेत आल्या होत्या. त्याच पार्श्वभूमीवर एटीएसने या परिसरावर विशेष लक्ष केंद्रित केल्याचे सांगितले जाते. या व्यापक मोहिमेमुळे राज्यभरात एकच खळबळ उडाली आहे. दहशतवादी संघटनांचे स्थानिक स्लीपर सेल, आर्थिक व्यवहारांचे धागेदोरे आणि संपर्क साखळी उघडकीस येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. जप्त केलेल्या डिजिटल उपकरणांची फॉरेन्सिक तपासणी सुरू असून, पुढील काही तासांत मोठे खुलासे होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# खासदार संजय राऊत यांनी थेट ठाकरे बंधूंनाच दिला आत्मपरीक्षणाचा संदेश

**मुंबई, ता. १५ :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांनंतर निर्माण झालेल्या राजकीय परिस्थितीवर भाष्य करताना शिवसेना खासदार संजय राऊत यांनी थेट ठाकरे बंधूंनाच आत्मपरीक्षणाचा संदेश दिला आहे. त्यांच्या मते, केवळ सत्ताधाऱ्यांवर टीका करून चालणार नाही; प्रभावी आणि मैदानात उतरलेले नेतृत्व उभे करणे अत्यावश्यक आहे.



राऊत यांनी स्पष्टपणे नमूद केले की, जर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांदरम्यान संपूर्ण महाराष्ट्र पालथा घातला असता, तर निकाल कदाचित वेगळे लागले असते. त्यांच्या मते, सत्ताधाऱ्यांनी ग्रामीण भागात व्यापक प्रचार केला, कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधला आणि मतदारांपर्यंत पोहोचण्याचा आक्रमक प्रयत्न केला. त्याच्या तुलनेत विरोधकांचे नेतृत्व मैदानात पुरेसे सक्रिय दिसले नाही.

राऊत यांनी हेही सूचित केले की, ठाकरे बंधूंनी भावनिक अपील आणि भूतकाळातील वारशावर अवलंबून न राहता नव्या पिढीशी थेट संवाद साधणारे आणि संघर्षाची तयारी दाखवणारे नेतृत्व उभे करणे गरजेचे आहे. तलवारीला तलवार भिडवणारे नेतृत्व या शब्दांत त्यांनी विरोधकांना सज्ज होण्याचा इशारा दिला.

त्यांच्या मते, शिवसेनेच्या दोन्ही गटांमध्ये झालेली फुट आणि नेतृत्वाची कमतरता याचा निवडणुकांवर परिणाम झाला. शिंदे गट प्रत्येक निवडणुकीत आक्रमकपणे पुढे जात असताना, ठाकरे बंधूंनी अधिक व्यापक रणनीती आखणे आवश्यक आहे, असे त्यांनी अधोरेखित केले.

या भाष्यामुळे महाविकास आघाडीतील नेतृत्वाच्या भूमिकेवर आणि विशेषतः ठाकरे बंधूंच्या सक्रियतेवर पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. आगामी महापालिका आणि स्थानिक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ठाकरे बंधूंची पुढील राजकीय चाल काय असेल, याकडे आता राज्याच्या राजकारणाचे लक्ष लागले आहे.

# शेतकऱ्यांना ३० जूनपूर्वी कर्जमाफी दिली जाईल : कृषिमंत्री दत्तात्रय भारणे

**मुंबई, ता. १५ :** राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देणारी महत्त्वाची माहिती समोर आली आहे. अवकाळी पाऊस, अतिवृष्टी, दुष्काळ आणि गारपिटीमुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना ३० जूनपूर्वी कर्जमाफी दिली जाईल, अशी माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भारणे यांनी दिली आहे. या निर्णयामुळे राज्यातील सुमारे २५ लाख शेतकऱ्यांना थेट लाभ मिळणार असून, दीर्घकाळापासून कर्जमाफीच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.



यापूर्वीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकरी कर्जमाफीसाठी ३० जून ही अंतिम मुदत जाहीर केली होती. कृषिमंत्री भरणे यांनी शनिवारी या घोषणेचा पुनरुच्चार करत सरकार आपल्या निर्णयावर ठाम असल्याचे स्पष्ट केले. कर्जमाफीच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याचेही त्यांनी सांगितले.

गेल्या काही वर्षांत राज्यातील शेतकरी सतत नैसर्गिक संकटांना सामोरे जात आहेत. अवकाळी पाऊस, अतिवृष्टी, दुष्काळ आणि गारपिटीमुळे अनेकांचे पीक नुकसान झाले आहे. त्यातच बाजारभावातील चढउतार, उत्पादन खर्चात वाढ आणि अपेक्षित दर न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती अधिकच बिकट झाली आहे. परिणामी सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती बँका तसेच राष्ट्रीयकृत बँकांकडून घेतलेली पीककर्जे मोठ्या प्रमाणावर थकली आहेत.

निवडणुकीच्या काळात शेतकऱ्यांना कर्जमाफीचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र प्रत्यक्ष अंमलबजावणीला विलंब होत असल्याने सरकारवर टीका झाली होती. या पार्श्वभूमीवर कर्जमाफीचा सखोल अभ्यास करण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. ही समिती कर्जमाफीची व्याप्ती, पात्रता आणि अंमलबजावणीची पद्धत ठरवणार आहे.

कृषिमंत्री भरणे यांनी सांगितले की, समितीचा अहवाल एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यात सरकारकडे सादर होणार आहे. त्यानंतर मंत्रिमंडळात चर्चा करून अंतिम निर्णय घेतला जाईल आणि ३० जूनपूर्वी प्रत्यक्ष कर्जमाफी लागू केली जाईल.

दरम्यान, सरकारकडून लाभार्थी शेतकऱ्यांची अचूक माहिती संकलनाचे काम सुरू असून, कर्जमाफीसाठी सर्व तयारी अंतिम टप्प्यात असल्याचेही सांगण्यात आले आहे. ३० जूनची अंतिम मुदत जवळ येत असताना शेतकऱ्यांच्या नजरा आता प्रत्यक्ष कर्जमाफीकडे लागल्या आहेत.

# महाशिवरात्रनिमित्त भाविकांनी घेतले कारेश्वराचे दर्शन

**पोपट पाचंगे**



रांजणगाव गणपती, ता. १५ : 'ॐ नमः शिवाय, कारेश्वर महाराज की जय' चा जयघोष करत श्री क्षेत्र कारेगाव, ता.शिरुर येथील श्री कारेश्वर महाराजांच्या दर्शनासाठी महाशिवरात्रनिमित्त भाविकांनी अलोट गर्दी केली होती. महाशिवरात्रीनिमित्त रविवारी (ता.१५) रोजी मध्यरात्री सव्वा बारा वाजण्याच्या सुमारास आळंदी देवस्थान ट्रस्टचे मुख्य विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे यांच्या हस्ते महापूजा व अभिषेक झाल्यानंतर मंदिर दर्शनासाठी खुले करण्यात आले.यावेळी देवस्थानचे पदाधिकारी व ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.

रविवारी पहाटे ४ वाजल्यापासून भाविकांची दर्शनासाठी मोठी गर्दी होती.यंदा रविवार व महाशिवरात्री एकाच दिवशी आल्याने कारेश्वर महाराजांच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.कारेगाव व परिसरातील भाविकांसह रांजणगाव एमआयडीसी येथील विविध कंपन्यात काम करणारे परप्रांतीय नागरिक यामुळे दर्शनासाठी दिवसभर मोठया प्रमाणात लांबच लांब रांगा दिसत होत्या. दर्शनासाठी आलेल्या भाविकांकरिता खिचडी प्रसाद व केळीचे वाटप कारेश्वर प्रसाद ग्रुप व ग्रामस्थ यांच्या वतीने करण्यात आले होते. मंदिर गाभारा व परिसरात विविधरंगी फुलांची आकर्षक सजावट युवा उद्योजक शुभम नवले व माजी सरपंच निर्मला नवले यांच्या वतीने करण्यात आली. रांजणगाव एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

दरम्यान, येथील सुपुत्र डॉ. देखणे यांची आळंदी देवस्थानच्या मुख्य विश्वस्तपदी नुकतीच निवड झाल्याबद्दल ग्रामपंचायत, कारेश्वर देवस्थान ट्रस्ट व ग्रामस्थ यांच्या वतीने शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

# महाशिवरात्री निमित्त महादेव मंदिरात दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न

**लोणी काळभोर, ता. १५ :** हर.. हर.. महादेव, बम.. बम.. भोले, च्या जयघोषात पूर्व हवेलीतील कदमवाकवस्ती, लोणी काळभोर, थेऊर, कुंजीरवाडी, सोरतापवाडी, उरुळी कांचन सह परिसरातील महादेव मंदिरामध्ये भाविकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. तसेच महाशिवरात्रीनिमित्त महादेव मंदिरामध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन रविवारी (ता. १५) करण्यात आले होते.




कदमवाकवस्ती (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील कवडीगावामध्ये पांडवकालीन महादेव मंदिरात पहाटे चार वाजता शिवलिंगाला अभिषेक घालून सत्यनारायणाची पूजा करण्यात आली. पाच वाजता काकड आरती, आठ वाजता गणपती पूजन जोशी काका यांच्या हस्ते करण्यात आली. तर उद्या रविवारी (ता.१६) सकाळी आठ ते दोन या वेळेत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

लोणी काळभोर येथील रामदरा शिवालय येथे पहाटे पूजा, भजन, पालखी मिरवणूक यासह विविध धार्मिक कार्यक्रम झाले. लोणी काळभोर मधील प्राचीन शिवालय मंदिरात शिवभक्तांनी पहाटेपासून दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या. पहाटे तीन वाजता महादेवाला अभिषेक करून पूजा करण्यात आली. सकाळी नऊ वाजता तुलसी रामायणाचा पाठ झाला. तर महिला भजनी मंडळांचा भजनाचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाचे आयोजन लोणी काळभोर येथील प्राचीन शिवालय सेवाधाम निकेतन मंडळाच्या वतीने करण्यात आले होते. कुंजीरवाडी येथे महाशिवरात्री मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. येथील महादेव मंदिरात शिवभक्तांनी शांततेत दर्शन घेतले. थेऊर ग्रामपंचायत हद्दीतील काकडे मळा येथील महादेव मंदिरामध्ये सकाळी सात वाजता महादेवाच्या पिंडीला अभिषेक घालून पूजा करण्यात आली. सकाळी अध्यात्मिक रहस्य सांगण्यात आले. दहा वाजण्याच्या सुमारास परिसरातील भजनी मंडळांचा कार्यक्रम झाला.

उरुळी कांचन येथील महादेव मंदिरात पहाटे अभिषेक, आरती करून भाविकांना मंदिर भाविकांना दर्शनासाठी खुले करून देण्यात आले. बायफ रोड महादेवनगर येथील मंदिरातहे भाविकांनी दर्शनासाठी रांगा लागल्या होत्या. यावेळी भाविकांसाठी खिचडीचे वाटप करण्यात आले. भवरापूर व टिळेकरवाडी गावाच्या वेशीवर असलेल्या फुटक्या महादेव मंदिरामध्ये नागरिकांनी सकाळपासून दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. महादेव मंदिरांमध्ये महाशिवरात्रीनिमित्त शिवभक्तांना केळी, चिवडा, लाडू आणि खिचडी वाटप करण्यात आले. लोणी काळभोर व उरुळी कांचन पोलिसांनी पोलीस ठाण्याच्या हद्दीत चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. सोरतापवाडी येथील सोरतापेश्वर देवस्थान सेवाभावी संस्थेच्या वतीने महाशिवरात्रीनिमित्त तीन दिवस विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सोरतापेश्वर मंदिरात मंगळवारी पहाटे चार ते सुर्योदयापर्यंत अभिषेक करण्यात आला.

## संक्षिप्त



### शिवरात्रीनिमित्त सोमेश्वर मंदिरात दर्शनासाठी भाविकांची अलोट गर्दी

**शिरूर, ता. १५ :** महाशिवरात्रीच्या पवित्र पर्वानिमित्त पिंपरी दुमाला येथील प्राचीन सोमेश्वर मंदिरात पहाटेपासूनच शिवभक्तांची अलोट गर्दी उसळली आहे. हर हर महादेवच्या जयघोषात संपूर्ण मंदिर परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला आहे. दर्शनासाठी भाविकांच्या लांबच लांब रांगा लागल्या असून मंदिर प्रशासनाने शिस्तबद्ध पद्धतीने दर्शन व्यवस्था केली आहे. पाच पांडवकालीन स्थापनेचा वारसा लाभलेल्या या प्राचीन मंदिराला ऐतिहासिक आणि धार्मिक महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे दरवर्षी महाशिवरात्रीच्या निमित्ताने पंचक्रोशीतील तसेच दूरवरूनही शिवभक्त मोठ्या श्रद्धेने येथे उपस्थित राहतात. पहाटे महाभिषेक, रुद्राभिषेक तसेच विशेष पूजाविधी मोठ्या भक्तिभावाने संपन्न झाले. दिवसभर भजन, कीर्तन आणि हरिनामाच्या गजरात मंदिर परिसर दुमदुमत आहे. भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याची तसेच इतर आवश्यक सुविधांची व्यवस्था करण्यात आली आहे. महाशिवरात्रीच्या निमित्ताने मंदिर परिसरात उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून श्रद्धा आणि परंपरेचा सुंदर संगम पिंपरी दुमाला येथील सोमेश्वर मंदिरात पाहायला मिळत आहे.

### विद्यार्थिनींना व्हॉट्सपवर मेसेज पाठवणाऱ्या प्राध्यापकावर गुन्हा दाखल

**बारामती, ता. १५ :** माळेगाव शहरातील एका कॉलेजमधील प्राध्यापकाने अल्पवयीन विद्यार्थिनींना अश्लील संदेश पाठवून मानसिक छळ केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी आरोपी प्राध्यापक नितीन शंकर तावरे (रा. सांगवी, ता. बारामती) याच्यावर पोक्सोसह अन्य गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीने डिप्लोमा प्रथम वर्षातील विद्यार्थिनींना व्हॉट्सपवर अश्लील मेसेज पाठवत ३० गुण माझ्या हातात आहेत अशी धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. या घटनेमुळे बारामती तालुका हादरून गेला असून पालकवर्गात तीव्र संताप व्यक्त होत आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

# पुण्यात हर्षवर्धन सपकाळ यांच्या त्या वक्तव्याने वातावरण पेटलं; भाजप काँग्रेस कार्यकर्ते आमनेसामने

## घोषणाबाजी, दगडफेक अन् तुंबळ हाणामारी

**पुणे, ता. १५ :** महाराष्ट्र काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी टिपू सुलतान यांची तुलना छत्रपती शिवाजी महाराज यांच्याशी केल्याच्या वक्तव्यामुळे पुण्यात राजकीय वातावरण अक्षरशः स्फोटक झाले. या वक्तव्याच्या निषेधार्थ भारतीय जनता पार्टी कडून रविवारी शहरातील काँग्रेस भवन पुणे समोर जोरदार आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाचे रुपांतर थेट हिंसाचारात झाले आणि भाजपभारतीय राष्ट्रीय काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये तासाभर चाललेला थरार पाहायला मिळाला.

दुपारी सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास भाजपचे शेकडो कार्यकर्ते काँग्रेस भवनासमोर जमले. छत्रपतींचा अपमान खपवून घेतला जाणार नाही, अशा घोषणा देत सपकाळ यांच्या वक्तव्याचा तीव्र निषेध करण्यात आला. काही संतप्त कार्यकर्त्यांनी सपकाळ यांच्या प्रतिमेला जोडे मारून संताप व्यक्त केला.

आंदोलन अधिक आक्रमक होत असतानाच काही कार्यकर्त्यांनी थेट काँग्रेस भवनात घुसखोरी करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे. परिस्थिती चिघळू लागल्याने पोलिसांनी तत्काळ हस्तक्षेप केला. मोठ्या प्रमाणावर बंदोबस्त तैनात करण्यात आला असला तरी दोन्ही बाजूंचे कार्यकर्ते आमनेसामने आल्याने परिसरात प्रचंड तणाव निर्माण झाला.

क्षणातच ढकलाढकली, शिवीगाळ आणि झटापट सुरू झाली. काँग्रेसकडून भाजप कार्यकर्त्यांनी



दगडफेक केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला असून या प्रकारात एक-दोन काँग्रेस कार्यकर्ते जखमी झाल्याची माहिती आहे. काँग्रेस नेत्यांनी तर काही आंदोलक टेम्पोभर दगड घेऊन आल्याचा दावा करत हा हल्ला पूर्वनियोजित असल्याचा आरोप केला आहे. या गोंधळानंतर काँग्रेसचे नेते मोहन जोशी आणि प्रशांत जगताप यांनी तीव्र शब्दांत आंदोलनाचा निषेध केला. दोषींवर तात्काळ गुन्हे दाखल करण्याची मागणी करत, गरज पडल्यास फरासखाना पोलीस ठाणे समोर ठिय्या आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला. जोपर्यंत गुन्हा दाखल होत नाही, तोपर्यंत आम्ही शांत बसणार नाही, असा स्पष्ट इशारा काँग्रेस कार्यकर्त्यांनी दिला आहे. या संपूर्ण घटनेमुळे पुण्यातील राजकीय वातावरण पुन्हा तापले असून, एका वक्तव्यामुळे रस्त्यावर उतरलेली ही लढाई आता पोलिस चौकशीपर्यंत पोहोचली आहे. दोन्ही पक्षांनी परस्परांवर गंभीर आरोप केले असून पोलिसांकडून घटनेची नोंद घेऊन पुढील तपास सुरू असल्याची माहिती देण्यात आली आहे.

दरम्यान, छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावावरून सुरू झालेला हा राजकीय संघर्ष येत्या काळात आणखी तीव्र होण्याची शक्यता असून, पुणे पुन्हा एकदा सत्तासंघर्षाच्या केंद्रस्थानी आले आहे.

# विद्यापीठ चौकातील दुमजली पुलावरून सुसाट धावणार गाड्या

**पुणे, ता. १५ :** शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी महत्त्वाचा ठरणारा गणेशखिंड रस्त्यावरील आचार्य आनंदऋषिजी महाराज चौक म्हणजेच विद्यापीठ चौकातील बहुप्रतिक्षित उड्डाणपूल लवकरच नागरिकांसाठी खुला होणार आहे. येत्या तीन दिवसांत कोणताही औपचारिक उद्घाटन कार्यक्रम न करता हा पूल थेट वाहतुकीसाठी सुरू करण्याच्या सूचना मुख्यमंत्री कार्यालयाकडून देण्यात आल्याची माहिती पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे. त्यामुळे पुणेकरांना मोठा दिलासा मिळणार आहे.

विद्यापीठ चौक हा पुण्यातील अतिशय वर्दळीचा परिसर म्हणून ओळखला जातो. सावित्रीबाई फुले



पुणे विद्यापीठ, आयटी कंपन्या, विविध शैक्षणिक संस्था तसेच औंध, बाणेर, कोथरूड आणि पाषाण या भागांकडे जाणारा हा मुख्य मार्ग असल्याने येथे नेहमीच मोठी वाहतूक कोंडी होते. सकाळी आणि संध्याकाळी कार्यालयीन वेळेत वाहनांची संख्या अधिक असल्यामुळे नागरिकांना बराच वेळ वाहतुकीत अडकून राहावे लागते.

उड्डाणपूल सुरू झाल्यानंतर चौकातील वाहतूक सुरळीत होण्यास मदत होईल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे. गणेशखिंड रस्त्यावरील प्रवासाचा वेळ कमी होणार असून वाहनचालकांचा वेळ आणि इंधन दोन्हीची बचत होईल. तसेच अपघातांचे प्रमाणही कमी होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, हिंजवडी ते शिवाजीनगर या मेट्रो मार्गाबाबतही सकारात्मक माहिती देण्यात आली आहे. या मार्गाचे काम अंतिम टप्प्यात असून येत्या एक ते दोन महिन्यांत मेट्रो सेवा सुरू होण्याची शक्यता आहे. आयटी क्षेत्रात काम करणारे कर्मचारी, विद्यार्थी आणि नोकरदार वर्गासाठी ही सेवा उपयुक्त ठरणार आहे. उड्डाणपूल, मेट्रो प्रकल्प आणि इतर पायाभूत सुविधा विकासामुळे पुणे शहरातील दैनंदिन प्रवास अधिक सोयीचा होणार आहे. या सर्व प्रकल्पांचा थेट फायदा सामान्य नागरिकांना होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

## पीए किसान योजनेचे २ हजार रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात पडणार

**मुंबई, ता. १५ :** देशातील शेतकऱ्यांसाठी राबवण्यात येणारी पंतप्रधान किसान सन्मान निधी योजना पुन्हा चर्चेत आली आहे. या योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना दरवर्षी ६००० रुपये तीन हप्त्यांमध्ये थेट बँक खात्यात दिले जातात. आतापर्यंत २१ हप्ते शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाले आहेत. आता सर्वांचे लक्ष २२ व्या हप्त्याकडे लागले आहे. मागील हप्ता १९ नोव्हेंबर २०२५ रोजी वितरित करण्यात आला होता.

ही योजना २०१९ मध्ये सुरू करण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या योजनेचा शुभारंभ झाला होता. थेट लाभ हस्तांतरण पद्धतीने पैसे देणारी ही देशातील मोठी योजना मानली जाते.

मिळालेल्या माहितीनुसार २२ वा हप्ता २४ फेब्रुवारी २०२६ रोजी जमा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र याबाबत केंद्र सरकारकडून अधिकृत घोषणा झालेली नाही. प्रशासन स्तरावर तयारी सुरू असल्याची माहिती मिळत आहे.

हप्ता मिळवण्यासाठी काही अटी पूर्ण करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांनी ई केवायसी प्रक्रिया पूर्ण केलेली असावी. भू सत्यापन पूर्ण असणे गरजेचे आहे. बँक खाते आधारशी जोडलेले असावे. तसेच बँक खात्याचा आयएफएससी कोड आणि खाते क्रमांक अचूक असणे आवश्यक आहे. यापैकी कोणतीही माहिती अपूर्ण असल्यास हप्ता थांबू शकतो.

उत्तर प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, राजस्थान, गुजरात, तामिळनाडू आणि तेलंगणा या राज्यांमध्ये फारर्मर आयडी अनिवार्य करण्यात येत आहे. फारर्मर आयडी नसल्यास लाभ मिळण्यात अडचणी येऊ शकतात.






## सिंहगड एक्स्प्रेसमध्ये मासिक पासधारक महिलांसाठी स्वतंत्र राखीव डब्याची मागणी

**पुणे, ता. १५ :** पुणे-मुंबई रेल्वे मार्गावरील प्रवास पुन्हा एकदा गर्दीच्या विळख्यात सापडला आहे. विशेषतः सिंहगड एक्स्प्रेस मध्ये दररोज प्रचंड गर्दी होत असल्याने प्रवाशांना अक्षरशः उभे राहण्यासही जागा मिळत नाही. जागा न मिळाल्यामुळे नियमित तिकीटधारक प्रवासी मासिक पासधारकांसाठी राखीव डब्यांमध्ये चढत आहेत. परिणामी पासधारक आणि इतर प्रवाशांमध्ये वादावादी वाढत असून महिलांना याचा सर्वाधिक त्रास सहन करावा लागत आहे.


ही समस्या लक्षात घेऊन पुणे-मुंबई-पुणे रेल्वे प्रवासी संघटना यांनी मासिक पासधारक महिलांसाठी स्वतंत्र राखीव डबा देण्याची मागणी केली आहे. यासंदर्भात मध्य रेल्वे प्रशासनाला निवेदन देण्यात आले असून, डेक्कन क्वीन एक्स्प्रेस, प्रगती एक्स्प्रेस आणि सिंहगड एक्स्प्रेसमध्ये नियमित तिकीट तपासणी व्हावी यासाठी सह्यांची मोहीमही राबवण्यात आली आहे. संघटनेच्या मते, पुणेमुंबई मार्गावरील या गाड्या हजारो नोकरदार, विद्यार्थी आणि व्यावसायिकांसाठी जीवनवाहिनी आहेत. मात्र कोरोना काळानंतर डब्यांची संख्या कमी करण्यात आली. उदाहरणार्थ, सिंहगड एक्स्प्रेसमध्ये पूर्वी १९ डबे होते, ते सध्या १४ वर आले आहेत. अनारक्षित प्रवाशांसाठी केवळ एकच जनरल डबा उपलब्ध असल्याने प्रवास अत्यंत गैरसोयीचा ठरत आहे.

दरम्यान, महिलांची सुरक्षितता आणि सुलभ प्रवास सुनिश्चित करण्यासाठी स्वतंत्र महिला डबा तसेच किमान तीन जनरल डबे पुन्हा जोडावेत, अशी मागणी संघटनेने केली आहे. वाढत्या प्रवासी संख्येच्या पार्श्वभूमीवर रेल्वे प्रशासनाने तातडीने उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे मत प्रवाशांकडून व्यक्त केले जात आहे.

## भाजप खासदाराची ४ कोटींची रेंज रोव्हर जळून खाक

**नाशिक, ता. १५ :** मुंबई-नाशिक महामार्गावर शुक्रवारी रात्री एक धक्कादायक घटना घडली. एका भाजपच्या खासदारांच्या आलिशान कारला अचानक भीषण आग लागली. ही आग इतकी तीव्र होती की काही वेळातच कोट्यवधी रुपयांची कार पूर्णपणे जळून खाक झाली. घटनास्थळी केवळ जळालेल्या गाडीचे अवशेष उरले आहेत. या घटनेचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर वेगाने पसरत असून, त्यातून आगीची भीषणता स्पष्टपणे दिसून येते.

ज्या खासदारांच्या कारला आग लागली ते लुंबा रामजी चौधरी असून ते राजस्थानमधील जालोर-सिरोही मतदारसंघाचे प्रतिनिधी आहेत. शुक्रवारी मध्यरात्री ते वाशिम येथील दौरा आटोपून नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर येथे दर्शनासाठी जात होते. त्यांच्या सोबत




काही सहकारी देखील कारमध्ये होते. शहापूर येथील अनिल बबन जाधव हे चालक कार चालवत होते. नाशिकजवळील गोंदे फाटा परिसरात आल्यानंतर चालकाला गाडीतून जळाल्यासारखा वास येऊ लागला. इंजिनमधून धूर निघताना दिसताच त्यांनी तात्काळ कार रस्त्याच्या कडेला थांबवली. प्रसंगावधान राखत त्यांनी खासदार आणि इतर प्रवाशांना त्वरित खाली उतरवले. सर्वजण सुरक्षितपणे बाहेर पडल्यानंतर काही मिनिटांतच आगीने भयानक रूप धारण केले आणि संपूर्ण कार जळू लागली.

आगीमुळे महामार्गावरील वाहतूक काही काळासाठी विस्कळीत झाली होती. स्थानिक अग्निशमन दलाला माहिती देण्यात आली, मात्र तोपर्यंत कार पूर्णपणे जळून गेली होती. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही, हे दिलासादायक आहे. प्राथमिक माहितीनुसार शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागली असावी, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला असून पुढील तपास सुरू आहे.

## जालना येथे नकली सोन्याचा हार देऊन उकळले ८ लाख रुपये

**जालना, ता. १५ :** जालना येथे भाजीविक्रेत्याची फसवणूक झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. भाजी खरेदीच्या निमित्ताने ओळख वाढवून, मुलगी आजारी असल्याचे सांगत खोटा सोन्याचा हार देऊन तब्बल ८ लाख रुपये उकळल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी संतोष नामदेव उमरे यांच्या तक्रारीवरून सदर बाजार पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपींविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संतोष उमरे हे जालन्यात भाजीपाला विक्रीचा व्यवसाय करतात. काही दिवसांपूर्वी दोन अनोळखी व्यक्ती त्यांच्या दुकानावर भाजी खरेदीसाठी येऊ लागल्या. दोन ते तीन वेळा व्यवहार झाल्यानंतर त्यांच्यात ओळख निर्माण झाली. त्यानंतर संबंधित व्यक्तींनी आपली मुलगी गंभीर आजारी असल्याचे



सांगितले. उपचारासाठी पैशांची गरज असल्याचे सांगत त्यांनी मदतीची विनंती केली. विश्वास बसावा यासाठी त्यांनी सोन्याचा हार देत २ लाख रुपये घेतले. यानंतर काही दिवसांनी पुन्हा संपर्क साधत मुलीची तब्येत अधिक बिघडल्याचे सांगण्यात आले. यावेळी ६ लाख रुपयांची गरज असल्याचे सांगून पुन्हा पैसे घेण्यात आले. सहानुभूतीपोटी संतोष उमरे यांनी ही रक्कमही दिली. काही काळानंतर संतोष उमरे यांनी मुलीच्या तब्येतीची विचारपूस करण्यासाठी फोन केला असता संबंधित व्यक्तींचे मोबाईल बंद येऊ लागले. त्यामुळे त्यांना संशय आला. त्यांनी दिलेला हार एका सोनाराकडे तपासणीसाठी नेला असता तो हार सोन्याचा नसून साध्या धातूपासून बनवलेला असल्याचे स्पष्ट झाले.

आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच संतोष उमरे यांनी सदर बाजार पोलिस ठाण्यात जाऊन तक्रार दाखल केली. पोलिसांनी अज्ञात दोन आरोपींविरोधात गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

## कुंजीरवाडी येथे अल्पवयीन मुलांच्या बुलेटने दिलेल्या धडकेत एकाचा मृत्यू

**लोणी काळभोर, ता. १४ :** पुणे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर पायी चाललेल्या व्यक्तीला विरुद्ध दिशेने चाललेल्या बुलेटने जोरदार धडक दिल्याची घटना घडली आहे. ही घटना कुंजीरवाडी (ता.हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील सत्कार हॉटेल व लॉज समोर शुक्रवारी (ता. १३) सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास घडली आहे. या अपघातात जखमी झालेल्या व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. तर दुचाकीवर मुले ही विद्यार्थी असून अल्पवयीन असल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे.

राजेंद्र सोपान काळभोर (वय ५२) असे मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. याप्रकरणी अक्षय राजेंद्र काळभोर (वय ३१, रा. सिद्रामम ळा, रामदरा रोड, लोणीकाळभोर ता. हवेली जि. पुणे) यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद



दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, राजेंद्र काळभोर हे थेऊर फाट्याकडून कुंजीरवाडीच्या दिशेकडे पुणे सोलापूर महामार्गावर पायी चालले होते. पायी चालत जात असताना, बुलेट मोटा सायकलवरील अनोळखी चालकाने त्याच्या ताब्यातील बुलेट मोटार सायकल वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करुन, राँग साईडने, भरधाव वेगात, हायगयीने, निष्काळजीपणाने व बेदरकारकपणे चालवुन, राजेंद्र काळभोर यांना जोरदार धडक दिली.

अपघातात गंभीर जखमी झालेल्या राजेंद्र काळभोर यांना उपचाराकरीता घेवुन न जाता, रोडचे बाजुला जखमी अवस्थेत सोडुन पळून गेले. या अपघातात गंभीर जखमी करुन राजेंद्र काळभोर यांचा मृत्यू झाला. या अपघातात व राजेंद्र काळभोर यांच्या मृत्यूस बुलेटवरील चालक कारणीभूत ठरला आहे. अशी फिर्याद अक्षय काळभोर यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात दिली आहे. त्यानुसार दुचाकीवरील अज्ञात चालकावर भारतीय न्याय संहिता कलम १०६ (१), २८१, १२५ (ब) सह मोटार वाहन कायदा कलम ११९/ १७७, १८४, १३४ (क) (ख) सह १८७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास लोणी काळभोर पोलीस करत आहेत.

# सोनेश्वरच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकांनी घेतला होडीचा आनंद

**गोरख जाधव**

डोर्लेवाडी, ता. १५ : बारामती तालुक्यातील सोनगाव येथे कऱ्हा व नीरा या पवित्र नद्यांच्या संगमावर वसलेल्या सोनेश्वराच्या प्राचीन मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त भाविकांची मोठी गर्दी उसळली. नदीपलीकडे असलेल्या मंदिरात जाण्यासाठी भाविकांनी होड्यांचा आधार घेतला असून सकाळपासूनच नदीकाठावर लांबलचक रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळाले.

महाशिवरात्रीच्या पवित्र दिवशी सोनेश्वराचे दर्शन घेण्यासाठी परिसरातील तसेच बाहेरील गावांमधूनही भाविक मोठ्या संख्येने दाखल झाले होते.



हर हर महादेवच्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. होडीतून प्रवास करत मंदिरापर्यंत पोहोचताना भाविकांमध्ये विशेष उत्साह आणि भक्तिभाव दिसून येत होता.

यंदाच्या उत्सवानिमित्त प्रशासनाने विशेष नियोजन केले होते. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या संकल्पनेतून भाविकांच्या सोयीसाठी दोन बोटींचे नियोजन करण्यात आले आहे. त्यापैकी एक तांत्रिक बोट पुणे जिल्हा परिषद बांधकाम विभाग (दक्षिण) यांच्या वतीने ग्रामपंचायत सोनगावकडे अधिकृतपणे सुपूर्त करण्यात आली आहे. दुसरी बोट या महिन्याअखेरपर्यंत उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली.

भाविकांचा प्रवास सुरक्षित व्हावा यासाठी यंदा विशेष काळजी घेण्यात आली आहे. दरवर्षीपेक्षा यावर्षी होडी प्रवासात बदल करून क्षमतेनुसारच प्रवासी नेले जात आहेत. तसेच सर्व प्रवाशांसाठी जीवनरक्षक जॅकेटची सक्ती करण्यात आली आहे. नदीकाठावर ग्रामपंचायत व स्थानिक प्रशासनाच्या वतीने सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली होती.

भाविकांच्या सोयीसाठी पिण्याच्या पाण्याची तसेच आरोग्य तपासणी केंद्राचीही व्यवस्था करण्यात आली आहे. रात्री उशिरापर्यंत दर्शनासाठी गर्दी कायम राहण्याची शक्यता असून, यंदाचा महाशिवरात्री उत्सव मोठ्या भक्तिभावात आणि उत्साहात साजरा होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

# कदमवाकवस्ती येथील घरफोडीचा अवघ्या दोन तासांत पर्दाफाश



## सव्वा ४ लाखांचा मुद्देमाल जप्त, लोणी काळभोर पोलिसांची दबंग कामगिरी

**लोणी काळभोर, ता. १३ :** घरी कोणी नसल्याची संधी साधून अज्ञात चोरट्याने घरफोडी करून घरातील सुमारे ४ लाख २५ हजार रुपयांच्या सोन्या-चांदीच्या दागिन्यांची चोरी केल्याची घटना घडली होती. ही घटना कदमवाकवस्ती (ता. हवेली) येथील पठारेवस्ती परिसरात ४ फेब्रुवारी ते ६ फेब्रुवारी यादरम्यान घडली आहे. लोणी काळभोर पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुरुवारी (ता.१२) गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी अवघ्या दोन तासांच्या आत आरोपीला अटक करून संपूर्ण मुद्देमाल हस्तगत केला आहे.

अदित्य अरुण गरड (वय १९, रा. फ्लॅट नं. ३०५, शुभयोग रेसिडेन्सी, कदमवाकवस्ती, ता. हवेली, जि. पुणे) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी शांती शंकर सोलंकी (वय ३५, व्यवसाय मजुरी, रा. पठारेवस्ती, कदमवाकवस्ती, ता. हवेली, जि. पुणे) यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी शांती सोलंकी या कुटुंबासोबत कदमवाकवस्ती परिसरात राहतात. सोलंकी या त्यांच्या वैयक्तिक कामानिनित्त ४ फेब्रुवारीला रात्री आठ वाजण्याच्या सुमारास कुटुंबासोबत बाहेरगावी गेल्या होत्या. तेव्हा त्यांनी घराला लॉक लावले होते. सोलंकी या ६ फेब्रुवारीला दुपारी चार वाजण्याच्या सुमारास घरी परतल्या. तेव्हा त्यांना घराचे कुलूप तुटलेल्या अवस्थेत आढळून आले.

सोलंकी यांनी घरात जाऊन पाहणी केली असता, घरात कपाटात ठेवलेले १६ ग्रॅम वजनाची सोन्याची चार कर्णफुले, ८ ग्रॅम वजनाचे दोन जोड कानातील वेल, ७ ग्रॅमचे मणीमंगळसूत्र, १४ नग चांदीच्या बांगड्या आणि एक चांदीचा कमरपट्टा असा चालू बाजार भावाप्रमाणे सुमारे ५ लाख रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला होता.

या प्रकरणी सोलंकी यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यानुसार अज्ञात आरोपीच्या विरोधात भारतीय न्याय संहिता कलम ३०५(अ), ३३१(३) व ३३१(४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर लोणी काळभोर पोलिस तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे आरोपीचा शोध होते. तेव्हा पोलिसांना ही घरफोडी आरोपी अदित्य गरड याने केली असून तो कदमवाकवस्ती परिसरात फिरत आहे. अशी माहिती एका खबऱ्या मार्फत मिळाली होती.

मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने पोलिसांनी सदर ठिकाणी सापळा रचून आरोपी अदित्य गरड याला गुरुवारी (ता.१२) रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास मोठ्या शिताफीने बेड्या ठोकल्या. आरोपीला ताब्यात घेऊन अधिक चौकशी केली असता, आरोपीने सदर गुन्हाची पोलिसांना कबुली दिली आहे. आरोपीकडून पोलिसांनी संपूर्ण मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपी अदित्य गरड याला न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने आरोपीला तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.

ही कारवाई पुणे शहर पोलीस उपायुक्त राजकुमार शिंदे, सहायक पोलीस आयुक्त अनुराधा उदमले तसेच लोणी काळभोर पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक (गुन्हे) स्मिता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. प्रत्यक्ष कामगिरी पोलीस उपनिरीक्षक अनिल जाधव, पोलीस हवालदार रामहरी वणवे, सागर जगदाळे, अंमलदार सुरज कुंभार, सचिन सोनवणे, राहुल कर्डिले, प्रवीण धडस, अशोक गिरी, प्रशांत सुतार व त्यांच्या सहकाऱ्यांनी केली नाहे.

### लोणी काळभोर पोलिसांचे होतेय कौतुक

मागील दोन दिवसांत सेवानिवृत्त कर्मचाऱ्यावर हल्ला करून लुटणाऱ्या चार आरोपींना अवघ्या ८ तासांत अटक, कुंजीरवाडीतील ऑटो कॉर्नर पेट्रोल पंपातील २ कोटी ६३ लाखांच्या अपहारातील मॅनेजरला बेड्या, आळंदी म्हातोबाची येथे तरुणांवर जीवघेणा हल्ला करणाऱ्या दोघांवर कारवाई, आणि आता घरफोडीतील आरोपी एका दिवसात गजाआड! सलग कारवायांमुळे लोणी काळभोर पोलिसांच्या धडाकेबाज कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

> परिसरातील घरफोडीच्या घटनांवर वेळीच लगाम घालण्यात पोलिसांना यश आले आहे. नागरिकांनी घराची सुरक्षितता वाढवावी व संशयास्पद हालचाली दिसल्यास तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा.
> - **स्मिता पाटील** (पोलीस निरीक्षक (गुन्हे)-लोणी काळभोर पोलीस ठाणे)

# शिरूर–न्हावरे रस्त्यावर झालेल्या अपघातात दोन कुटुंबं उद्ध्वस्त




**शिरूर, ता. १५ :** शिरूर तालुक्यातील शिरूर-न्हावरे रस्त्यावर शुक्रवारी मध्यरात्री घडलेल्या भीषण अपघाताने निमोणे गावावर शोककळा पसरली आहे. नलगे वस्ती परिसरात खासगी कार आणि ट्रकची समोरासमोर धडक होऊन एकाच कुटुंबातील तिघांचा जागीच मृत्यू झाला, तर एक महिला गंभीर जखमी झाली.

निमोणे येथील पवन राजहंस काळे (वय ३८), त्यांची नऊ वर्षांची मुलगी आराध्या आणि मेहुणे बाळासाहेब नागवडे (वय ३८) यांचा या अपघातात मृत्यू झाला. पवन यांची पत्नी वंदना काळे गंभीर जखमी असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. काळे कुटुंब कोल्हापूरला नातेवाईकांना भेटून परत येत होते. रात्री सुमारे एकच्या सुमारास त्यांच्या कारची समोरून येणाऱ्या भरधाव ट्रकशी जोरदार धडक झाली. धडकेची तीव्रता इतकी होती की कारचा अक्षरशः चुराडा झाला. स्थानिकांच्या मते, शिरूर-न्हावरे मार्गावर रात्रीच्या वेळी जड वाहतूक मोठ्या प्रमाणात असते. रस्ता काही ठिकाणी अरुंद असून पुरेशी प्रकाशयोजना नाही. वेगमर्यादा पाळली जात नसल्याने अपघातांची मालिका सुरूच आहे. मध्यरात्रीच्या सुमारास चालकाचा थकवा, कमी दृश्यता आणि वेग यांचा संगम घातक ठरल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

या घटनेने रस्ते सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. ग्रामीण भागातील प्रमुख मार्गांवर स्पीड कॅमेरे, परावर्तक फलक, योग्य प्रकाशयोजना आणि नियमित गस्त आवश्यक असल्याचे नागरिक सांगतात. अपघातानंतर ट्रकचालकाची चौकशी सुरू असून नेमके कारण तपासले जात आहे. दरम्यान, भंडारा जिल्ह्यातील तुमसर तालुक्यातही तत्सम घटना घडली. रोहनीटोला-डोंगरी (बुज.) मार्गावर भरधाव पिकअपने दुचाकीला धडक दिल्याने श्रीराम चचाने (५२) यांचा मृत्यू झाला, तर त्यांच्या पत्नी शामकला (४८) गंभीर जखमी झाल्या. धडक देऊन चालक फरार झाला. सलग घडणाऱ्या अशा अपघातांमुळे वेग आणि निष्काळजीपणाविरुद्ध कठोर कारवाईची मागणी पुन्हा जोर धरू लागली आहे.

# अजित पवार गटाचे मंत्री तीन दिवसांपासून 'नॉट रिचेबल', राजीनाम्याची टांगती तलवार?



**मुंबई, ता. १५ :** महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात सध्या मोठी खळबळ उडाली असून राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत घडामोडींना वेग आला आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर पक्षाचे दोन्ही गट पुन्हा एकत्र येण्याबाबत शरद पवार गटाकडून हालचाली सुरू झाल्या आहेत. मात्र, दुसऱ्या बाजूला अजित पवार गटातील सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेल आणि छगन भुजबळ यांसारख्या ज्येष्ठ नेत्यांनी या विलीनीकरणाला विरोध दर्शवल्याचे समजते. या राजकीय पेचप्रसंगातच राज्याचे मंत्री नरहरी झिरवाळ अचानक संपर्क क्षेत्राच्या बाहेर गेल्याने उलटसुलट चर्चांना उधाण आले आहे.

झिरवाळ यांच्या अडचणीत वाढ होण्याचे मुख्य कारण मंत्रालयातील अन्न व औषध प्रशासन विभागात उघडकीस आलेले लाचखोरीचे प्रकरण आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने या विभागातील लिपिक राजेंद्र ढेरंगे याला ३५,००० रुपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडले. एका मेडिकल स्टोअरचा निलंबित झालेला परवाना पुन्हा सुरू करून देण्यासाठी ही लाच मागण्यात आली होती. अटकेनंतर या लिपिकाने असा खळबळजनक दावा केला की, त्याने ही रक्कम मंत्री झिरवाळ यांच्या खासगी सचिवाच्या सांगण्यावरून घेतली होती. या खुलाशामुळे थेट मंत्र्यांचे कार्यालय संशयाच्या घेऱ्यात आले असून विरोधक आता अधिक आक्रमक झाले आहेत.

या प्रकरणानंतर नरहरी झिरवाळ यांनी त्यांचे शनिवारचे सर्व नियोजित कार्यक्रम रद्द केले आहेत. नाशिकमध्ये आयोजित पहिल्या राज्यस्तरीय आदिवासी साहित्य व सांस्कृतिक संमेलनाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते होणार होते, परंतु त्यांच्या अनुपस्थितीमुळे आयोजकांची मोठी तारांबळ उडाली. विरोधकांनी या मुद्द्यावरून सरकारवर कडक शब्दांत टीका करत झिरवाळ यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. मंत्रालयात मंत्र्यांच्या दालनातच भ्रष्टाचार होत असेल तर हे सरकार कोणासाठी चालले आहे, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

दुसरीकडे, नरहरी झिरवाळ यांनी या आरोपांवर आपली भूमिका स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. ज्या दिवशी ही घटना घडली, त्या दिवशी आपण मुंबईत नव्हतो, असे त्यांनी सांगितले आहे. जर या प्रकरणात आपला किंवा आपल्या कार्यालयाचा कोणताही दोष आढळला, तर नैतिक जबाबदारी स्वीकारून आपण पदाचा राजीनामा देऊ, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. आपली बाजू मांडण्यासाठी ते सोमवारी मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याची माहिती समोर आली आहे.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

# न्हावरे येथे महाशिवरात्र उत्सवानिमित्त श्री मल्लिकार्जुन कावड सोहळ्याला उत्स्फुर्त प्रतिसाद

**योगेश मारणे**

न्हावरे, ता. १५ : महाशिवरात्र उत्सवानिमित्त न्हावरे (ता. शिरूर) येथील ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन मंदिर येथून पारंपरिक कावड सोहळ्याचे ढोल-ताशांच्या गजरात आणि हर हर महादेवच्या जयघोषात रांजणगाव सांडस-वाळकी संगम बेट येथील श्री संगमेश्वर मंदिराकडे मोठ्या उत्साहात आणि भक्तिपूर्ण वातावरणात प्रस्थान झाले.

रविवारी (ता. १५) पहाटे मंदिरात श्रींचा महाभिषेक विधीपूर्वक पार पडला. त्यानंतर कावड मिरवणुकीस सुरुवात होताच परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले.पारंपरिक वाद्यांच्या तालावर निघालेल्या मिरवणुकीत ग्रामस्थ, युवक मंडळे, महिला वर्ग आणि भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी विविध क्षेत्रांतील मान्यवर, भक्तजन आणि नागरिकांनी उपस्थित राहून श्री मल्लिकार्जुन महाराजांचे दर्शन घेतले.



दरम्यान, श्री मल्लिकार्जुन भजनी मंडळाच्या वतीने सुश्राव्य संगीत भजनाचा कार्यक्रम सादर करण्यात आला. भक्तिरसात न्हाऊन निघालेल्या या कार्यक्रमास भाविकांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.

मल्लिकार्जुन मंदिरात कै. बेबीताई बोथरा यांच्या स्मरणार्थ सामाजिक कार्यकर्ते व उद्योजक विकासशेठ बोथरा यांच्या वतीने दिवसभर भाविकांसाठी खिचडी वाटपाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच महादेवनगर (रानातला महादेव) येथेही दर्शनासाठी मोठी गर्दी झाली होती. येथे राजेंद्र कांगुने आणि पोपट जाधव यांच्या वतीने भाविकांना खिचडीचे वाटप करण्यात आले.

आज (ता. १५) रात्री परिसरातील रानातील महादेव मंदिरात हभप गणेश महाराज शिंदे यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले असून, सकाळी शिवलीला अमृत ग्रंथ पारायण पार पडले.मंदिर परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे सोमवारी (ता. १६) संदीप होलगुंडे यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे

## प्राईम लाईफ



## तेलकट पदार्थ खाणे आरोग्यासाठी फायदेशीर की नुकसानदायक?

हिवाळ्याचा कडाका वाढला की गरमागरम भजी, वडापाव किंवा तळलेले पदार्थ खाण्याची ओढ सर्वांनाच लागते. पण, या ऋतूत अति प्रमाणात तेलकट खाणे तुमच्या आरोग्यावर नेमका काय परिणाम करते, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. आहारतज्ज्ञांच्या मते, थंडीच्या दिवसात शरीराचे तापमान टिकवून ठेवण्यासाठी अधिक ऊर्जेची गरज असते, मात्र तेलकट पदार्थांचे सेवन करताना मोठी काळजी घेणे आवश्यक आहे.

हिवाळ्यात आपल्या शरीरातील चयापचय क्रिया मंदावते. थंडीत भूक जास्त लागते कारण शरीराला स्वतःला उबदार ठेवण्यासाठी कॅलरीजची गरज असते. अशा वेळी मर्यादित प्रमाणात चांगले फॅट्स घेणे फायदेशीर ठरू शकते, परंतु बाहेरचे आणि वारंवार तळलेले पदार्थ शरीरात कोलेस्ट्रॉल वाढवण्याचे काम करतात.

होणारे दुष्परिणाम : अति तेलकट खाल्ल्यामुळे हिवाळ्यात पचनसंस्थेवर ताण येतो. या ऋतूत शारीरिक हालचाली कमी होतात, ज्यामुळे वजन वेगाने वाढण्याची शक्यता असते. तसेच, तेलकट पदार्थांमुळे त्वचेवर पिंपल्स येणे किंवा घसा खराब होणे अशा समस्या उद्भवू शकतात. हृदयाचे आरोग्य जपणाऱ्या व्यक्तींसाठी तर असा आहार धोक्याचा ठरू शकतो.

पर्याय काय? : तज्ज्ञांच्या मते, तेलकट पदार्थांऐवजी बदाम, अक्रोड, तीळ किंवा शेंगदाणे यांसारख्या नैसर्गिक तेलयुक्त पदार्थांचा आहारात समावेश करावा. यामुळे शरीराला आवश्यक गुड फॅट्स मिळतात आणि उष्णताही टिकून राहते. जर तुम्हाला तळलेले पदार्थ खायचेच असतील, तर ते घरी बनवलेले आणि ताज्या तेलातील असावेत.

थोडक्यात सांगायचे तर, हिवाळ्यात चवीसाठी कधीतरी तेलकट खाणे ठीक असले, तरी त्याचे रोजचे सवयीत रूपांतर करणे आरोग्यासाठी महागात पडू शकते. त्यामुळे थंडीचा आनंद घेताना सकस आणि संतुलित आहारालाच प्राधान्य देणे योग्य ठरेल.

## व्हॅलेंटाईन डेला तरुणाची आत्महत्या

**पुणे, ता. १५ :** व्हॅलेंटाईन डेच्या दिवशी घडलेल्या एका दुर्दैवी घटनेने पिंपरी-चिंचवड परिसर हादरून गेला आहे. वाल्हेकरवाडी येथील गुरुद्वारा चौकाजवळ एका २४ वर्षीय तरुणाने गळफास घेऊन जीवन संपवल्याची घटना शनिवारी (१४ फेब्रुवारी) दुपारी उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मृत तरुणाचे नाव समर्थ संजय माळी (वय २४) असून तो मूळचा सोलापूर जिल्हा येथील रहिवासी होता. सध्या तो गुरुद्वारा चौकाजवळील वाल्हेकरवाडी परिसरात मित्रांसोबत राहत होता व एका खासगी फायनान्स कंपनीत कार्यरत होता.

मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी दुपारी समर्थचे मित्र जेवणासाठी बाहेर गेले असताना त्याने घरात गळफास घेतला. मित्र परत आल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला असून पुढील तपास सुरू आहे.

# नवनिर्वाचित पंचायत समिती सदस्य युवराज काकडे यांच्याकडून ज्येष्ठ नागरिक कार्डचे वाटप

**लोणी काळभोर, ता. १५ :** हवेली तालुका पंचायत समितीचे नवनिर्वाचित सदस्य युवराज हिरामण काकडे यांनी निवडून आल्यावर समाजाभिमुख उपक्रम राबवत ज्येष्ठ नागरिक ओळखपत्रांचे वाटप करून आपल्या कामाची सुरुवात केली.

थेऊर येथे आयोजित कार्यक्रमात ज्येष्ठ नागरिकांना सन्मानपूर्वक कार्डांचे वितरण करण्यात आले. शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेले हे ओळखपत्र मिळाल्याने ज्येष्ठ नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.



यावेळी बोलताना युवराज काकडे यांनी सांगितले की, ज्येष्ठ नागरिक हे समाजाचे आधारस्तंभ आहेत. त्यांच्या समस्या सोडविणे आणि त्यांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळवून देणे ही आपली प्राथमिक जबाबदारी आहे. पुढील काळात आरोग्य शिबिरे, प्रलंबित पेन्शन प्रकरणे तसेच ग्रामविकासाशी संबंधित प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमास जेष्ठ नागरिक उपस्थित होते. ज्येष्ठ नागरिकांनीही या उपक्रमाचे स्वागत करत नव्या प्रतिनिधींचे अभिनंदन केले.

आरोग्यदूत युवराज काकडे यांनी एक महिन्यापूर्वी आळंदी, कुंजीरवाडी, थेऊर, कोलवडी, मांजरी, आव्हाळवाडी या गावांत शिबिर आयोजन केले होते त्यामध्ये ५०० पेक्षा जास्त ज्येष्ठ नागरिकांनी सहभाग नोंदवला होता.

दरम्यान, थेऊर व कुंजीरवाडी या गावांचे कार्ड वाटप पूर्ण झाले आहे. कोलवडी, मांजरी व आव्हाळवाडी या गावांचे कार्ड वाटप, जिल्हा परिषद सदस्या कोमल संदेश आव्हाळे व पंचायत समिती सदस्या सुषमा मुरकुटे यांच्या मार्गदर्शनाखाली लवकरच होणार असल्याचे आरोग्यदूत युवराज काकडे यांनी यावेळी पुणे प्राईम न्यूजशी बोलताना सांगितले.

## भिगवणमध्ये अवैध धंद्यांना राजाश्रयाचा संशय?

**सागर जगदाळे**

भिगवण, ता. १५ : भिगवण व परिसरात मटका-जुगार, अवैध हातभट्टी दारू विक्री आणि देहविक्रीचे जाळे पुन्हा एकदा मजबूत झाल्याची चर्चा नागरिकांत रंगली आहे. मात्र या सर्व प्रकारांवर स्थानिक पोलिसांची ठोस कारवाई दिसून न आल्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

काही महिन्यांपूर्वी मदनवाडी परिसरातील एका लॉजवर पुणे पोलिसांनी धाड टाकून कारवाई केली होती. त्या कारवाईदरम्यान काही तरुणींची सुटका करण्यात आली होती. ही कारवाई बाहेरील पथकाकडून झाली; मग स्थानिक स्तरावर अशी कारवाई का होत नाही? हा थेट सवाल आता नागरिक विचारू लागले आहेत.

दरम्यान, मटका व्यवसायाने आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरली आहे. व्हॉट्सॲपवरून आकडे स्वीकारले जात असून ऑनलाईन व्यवहारातून एक मेसेज आणि मटका फिक्स अशी सोय उपलब्ध झाल्याचे सांगितले जाते. त्यामुळे घरबसल्या जुगार खेळण्याची सुविधा वाढली असून हा अवैध धंदा अधिक बळकट होत असल्याचे चित्र आहे.

अवैध हातभट्टी दारू विक्रीही काही भागांत उघडपणे सुरू असल्याचे आरोप आहेत. काही ठिकाणी खुलेआम व्यवहार होत असतानाही कारवाई होत नसल्याने नेमके संरक्षण कुणाचे? असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.

भिगवण परिसरात अवैध धंद्यांना कोणाचा वरदहस्त आहे? स्थानिक पोलिसांची भूमिका नेमकी काय? आणि या सर्वामागे काही आर्थिक गणित दडले आहे का? या प्रश्नांची उत्तरे अद्याप गुलदस्त्यात आहेत.आता तरी संबंधित यंत्रणांनी गांभीर्याने दखल घेऊन कठोर आणि सातत्यपूर्ण कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.



## हडपसर–सासवड या दोन्ही मार्गिकांसाठी सल्लागार नेमण्याची प्रक्रिया सुरू

**पुणे, ता. १५ :** पुण्यातील वाढती वाहतूक कोंडी लक्षात घेऊन महामेट्रो ने मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्याला गती दिली आहे. या टप्प्यात मार्गिका ४-इ (हडपसर-लोणी काळभोर) आणि ४-उ (हडपसर-सासवड) यांचा समावेश असून पूर्व व दक्षिण उपनगरांना थेट जोडणी देण्यावर भर आहे. दोन्ही मार्गिकांसाठी सल्लागार नेमण्याची प्रक्रिया सुरू झाली असून निविदांची अंतिम मुदत ५ मार्च २०२६ आहे.

मेट्रो ४- इ : हडपसर -लोणी काळभोर सुमारे ११.१० किमी लांबीची ही पूर्णतः उन्नत मार्गिका असेल. एकूण १० स्थानकेप्रस्तावित आहेत हडपसर फाटा, हडपसर बस डेपो, आकाशवाणी-हडपसर, लक्ष्मी कॉलनी, मांजरी फाटा, द्राक्ष बाग, टोल नाका, वाक वस्ती आणि लोणी काळभोर आदी. या मार्गावर डबल डेकर उड्डाणपूल उभारले जाणार आहेत. खाली वाहनांसाठी रस्ता आणि वर मेट्रो मार्गिका. त्यामुळे पुणे-सोलापूर महामार्गवरील दैनंदिन कोंडी कमी होण्यास मदत होईल.

मेट्रो ४-उ : हडपसरसासवड सुमारे ५.५७ किमी लांबीच्या या मार्गिकेवर ४ स्थानके प्रस्तावित आहेत. हडपसर ग्लायडिंग क्लब, फुरसुंगी खढ पार्क, सुलभ उद्यान आणि सासवड रस्ता रेल्वे स्थानक. औद्योगिक आणि आयटी पट्ट्यातील प्रवाशांना याचा मोठा फायदा होईल.

या दोन्ही मार्गिका खडकवासला खराडी कॅरीडोरचा भाग आहेत. हडपसर, फुरसुंगी, लोणी काळभोर आणि सासवड परिसरातील वाढत्या लोकसंख्येमुळे सार्वजनिक वाहतुकीची गरज तीव्र झाली आहे. नव्या मार्गिकांमुळे शहराच्या मध्यवर्ती भागावरचा ताण कमी होऊन उपनगरांतील प्रवासाचा वेळ लक्षणीय घटेल, अशी अपेक्षा आहे.

दरम्यान, हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो मार्गिका अंतिम टप्प्यात असून लवकरच प्रवाशांसाठी खुली होणार आहे. विस्ताराच्या या टप्प्यामुळे पुण्यातील मेट्रो जाळे अधिक व्यापक होऊन कोंडीमुक्त, वेळेवर आणि पर्यावरणपूरक प्रवासाचा पर्याय बळकट होणार आहे.

# गरीबरथ एक्सप्रेसमध्ये चोरट्यांनी दोन प्रवाशांना घातला ७ लाखांचा गंडा

**पुणे, ता. १५ :** दौंडजवळून धावणाऱ्या गरीबरथ एक्सप्रेसमध्ये शनिवारी (१४ तारखेला) दोन वेगवेगळ्या चोरीच्या घटना घडल्या असून, एकूण सुमारे ७ लाख रुपयांचा ऐवज लंपास झाल्याची माहिती समोर आली आहे. या घटनांमुळे रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

पहिली घटना नागपूरपुणे मार्गावरील गाडीत घडली. औंध येथील जया पंकज जाजू (वय ५५) या धामणगावहून पुण्याकडे प्रवास करत होत्या. दौंड कॉर्ड लाईन स्थानक सुटल्यानंतर त्यांच्या आसनाजवळ ठेवलेली पर्स गायब झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. पर्समध्ये सोन्या-हिऱ्याचे दागिने कानातले, हिऱ्याचे ब्रेसलेट, मंगळसूत्र, दोन डायमंड अंगठ्या, तीन सोन्याच्या अंगठ्या आणि रोख पाच हजार रुपये असा सुमारे ६ लाख ६० हजार रुपयांचा ऐवज होता.



दुसऱ्या घटनेत लोहगाव, पुणे येथील सचिन रमेश नगरकर (वय ४३) यांच्या बॅगेतून ७१हजार ५०० रुपयांची रोकड आणि महत्त्वाची कागदपत्रे चोरीस गेली. दोन्ही घटना एकाच गाडीत आणि जवळपास त्याच वेळेत घडल्याने रेल्वे पोलिस तपास करत आहेत की या चोऱ्यांमागे एकाच टोळीचा हात आहे का.

जया जाजू यांनी पुणे लोहमार्ग पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल केली असून, पुढील तपासासाठी प्रकरण दौंड लोहमार्ग पोलीस ठाणेकडे वर्ग करण्यात आले आहे. सीसीटीव्ही फुटेज, सहप्रवाशांची माहिती आणि तिकीट तपासणी यांची पडताळणी सुरू आहे. दरम्यान, रेल्वे पोलिसांनी प्रवाशांना मौल्यवान दागिने व मोठी रक्कम उघडपणे न ठेवण्याचे, बॅग साखळीने सुरक्षित बांधण्याचे आणि संशयास्पद हालचाली त्वरित टीटीई किंवा पोलिसांना कळवण्याचे आवाहन केले आहे. वारंवार घडणाऱ्या अशा घटनांमुळे लांब पल्ल्याच्या गाड्यांमध्ये सुरक्षाव्यवस्था अधिक कडक करण्याची मागणी होत आहे.

# भाजपचे आमदार संजय केणेकर यांच्या कार्यालयात सापडली एअरगन

**छत्रपती संभाजीनगर, ता. १५ :** छत्रपती संभाजीनगर शहरात शनिवारी (ता.१४) दुपारी एक प्रकार समोर आल्याने काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. भाजपचे आमदार संजय केणेकर यांच्या कार्यालयात एका बॅगेत एअरगन आढळून आली. सुरुवातीला ती पिस्तूल असल्याची चर्चा पसरली होती. त्यामुळे कार्यालयातील कर्मचारी आणि परिसरातील नागरिकांमध्ये चिंता वाढली होती. मात्र पोलिसांनी तपास केल्यानंतर ती एअरगन असल्याचे स्पष्ट झाले.




मिळालेल्या माहितीनुसार, रितेश संतोष होळकर (वय २१) हा तरुण या प्रकरणात संबंधित आहे. तो बीएस्सीच्या तृतीय वर्षात शिक्षण घेत असून काही दिवसांपासून नोकरीच्या शोधात होता. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेत कंत्राटी पद्धतीने नोकरी मिळवण्यासाठी त्याला आमदारांचे शिफारसपत्र घेण्याचा सल्ला देण्यात आला होता. त्यानुसार तो शुक्रवारी सायंकाळी आमदारांच्या कार्यालयात गेला होता. काम आटोपल्यानंतर बाहेर पडताना त्याची बॅग तिथेच राहिली.


शनिवारी दुपारी कार्यालयातील कर्मचाऱ्यांना एका कोपऱ्यात ठेवलेली बॅग दिसली. संशय आल्याने बॅग तपासली असता त्यात पिस्तूलसारखी दिसणारी वस्तू आढळली. खबरदारी म्हणून तात्काळ क्रांती चौक पोलिस ठाण्याशी संपर्क साधण्यात आला. पोलिसांनी घटनास्थळी येऊन बॅग ताब्यात घेतली आणि तपास सुरू केला. प्राथमिक तपासात ती एअरगन असल्याचे समोर आले.

पोलिसांनी रितेशचा शोध घेऊन त्याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने सुमारे ६ महिन्यांपूर्वी ऑनलाइन खरेदीतून हौस म्हणून एअरगन घेतल्याचे सांगितले. नोकरीच्या कामासाठी भेट दिल्यानंतर बॅग विसरल्याचेही त्याने स्पष्ट केले. या प्रकरणी क्रांती चौक पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. या घटनेमुळे काही काळ तणाव निर्माण झाला होता, मात्र सत्य समोर आल्यानंतर परिस्थिती शांत झाली.

# पिंप्री अंतुर गावाची साडेचार हजार लोकसंख्या, पण चार महिन्यांत तब्बल ३,४४८ जन्मनोंदी

**छत्रपती संभाजीनगर, ता. १५ :** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. सोयगाव तालुका येथील मोहळाई ग्रुप ग्रामपंचायतीत अवघ्या साडेचार हजार लोकसंख्या असलेल्या पिंप्री अंतुर गावात चार महिन्यांत तब्बल ३,४४८ जन्मनोंदी करण्यात आल्याचे आढळले. या कालावधीत केवळ आठ मृत्यूंच्या नोंदी आहेत. आकडेवारीतील हा प्रचंड तफावत संशय निर्माण करणारा ठरला आणि चौकशीअंती या सर्व नोंदी बोगस असल्याचे स्पष्ट झाले.

१ एप्रिल ते २ ऑगस्ट २०२५ दरम्यान सीआरएसपोर्टलवरील ग्रामपंचायतीच्या युजर आयडीचा वापर करून या नोंदी करण्यात आल्या. विशेष म्हणजे संबंधित युजर आयडी प्रत्यक्षात वापरात नसल्याचे ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी सांगितले. मग इतक्या मोठ्या प्रमाणावर नोंदी कशा झाल्या, हा प्रश्न निर्माण झाला. जिल्हा आरोग्य विभागाच्या प्राथमिक तपासात हा पासवर्ड बिहारमधून हॅक करून गैरवापर केल्याचे समोर आले.




या प्रकारामुळे जन्म-मृत्यू नोंदणी व्यवस्थेच्या सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. जन्मनोंद ही केवळ कागदोपत्री प्रक्रिया नसून ती नागरिकत्व, शाळा प्रवेश, शासकीय योजना आणि ओळखपत्रांसाठी अत्यंत महत्त्वाची कडी असते. मोठ्या प्रमाणावर बोगस नोंदी झाल्यास त्याचा वापर बेकायदेशीर कागदपत्रे तयार करण्यासाठी होऊ शकतो, अशी भीती व्यक्त होत आहे.

दरम्यान, भाजप नेते किरीट सोमय्या यांनी यापूर्वी जिल्ह्यात बांगलादेशी नागरिकांच्या बोगस नोंदींचा मुद्दा उपस्थित केला होता. या नव्या घडामोडींमुळे त्या आरोपांना नव्याने अधोरेखित केल्याची चर्चा सुरू आहे.

राज्याच्या जन्म-मृत्यू नोंदणी विभागाने सर्व संशयित नोंदी तत्काळ रद्द करण्याचे आदेश दिले असून अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपासात या सायबर घोटाळ्यामागील नेमके जाळे उघड होण्याची शक्यता आहे.

# भिगवण येथील क्षीरसागर कॉलेजचे बारावीचे परीक्षा केंद्र पूर्ववत करा

## मुंबई उच्च न्यायालयाने आदेश

**सागर जगदाळे**

भिगवण ता. १५ : भिगवण (ता. इंदापूर) येथील कोंडीराम सदाशिव क्षीरसागर आर्ट्स, कॉमर्स, सायन्स जुनिअर कॉलेज येथील बारावीचे परीक्षा केंद्र पूर्ववत सुरू ठेवण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने पारित केले आहेत.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, फेब्रुवारी २०२५ च्या बारावीच्या परीक्षेवेळी या परीक्षा केंद्रावर एका विद्यार्थिनीजवळ भरारी पथकास कॉपी सापडली होती.त्यामुळे या विद्यार्थिनीवर कॉपी केस करून विभागीय शिक्षण मंडळाकडून परीक्षा केंद्र रद्द करण्यात आले. तद्नंतर विद्यालयाने या निर्णयाविरुद्ध मुंबई उच्च न्यायालयात धाव घेत जनहित याचिका दाखल केली.



इंदापूर तालुक्यातील आणखी एका परीक्षा केंद्रावर असाच प्रकार उघडकीस आला होता तरीही विभागीय मंडळाकडून ते परीक्षा केंद्र पूर्ववत सुरू करण्यात आल्याची बाब न्यायालयाच्या निदर्शनास आली. केवळ एका विद्यार्थिनीजवळ कॉपी सापडल्याने पूर्ण परीक्षा केंद्र रद्द करणे योग्य नसल्याचे मत नोंदवण्यात आले. कॉपी मुक्त वातावरणात परीक्षा व्हाव्यात असेही न्यायालयाने निरीक्षणामध्ये नमूद केले याबाबत दोन्ही बाजूने युक्तिवाद करण्यात आला.

त्यानंतर पुढील शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून क्षीरसागर विद्यालयातील परीक्षा केंद्र पूर्ववत सुरू ठेवण्याचे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. संस्थेच्या विद्यालयाच्या वतीने ॲड. लक्ष्मण देशमुख यांनी युक्तिवाद केला.

याबाबत संस्थेचे अध्यक्ष अजित क्षीरसागर यांनी सांगितले की, येत्या शैक्षणिक वर्षापासून परीक्षा केंद्र पूर्ववत सुरू होणार आहे. फेब्रुवारी २०२७ मधील बारावीच्या परीक्षा क्षीरसागर विद्यालयातच होणार आहेत. एका विद्यार्थ्याच्या गैरप्रकारामुळे संपूर्ण परीक्षा केंद्र रद्द करणे अयोग्य आहे. असा निर्णय संस्थेच्या प्रतिमेला धक्का देणारा असून त्याचा फटका विद्यार्थ्यांना बसतो. न्यायालयाने परीक्षा केंद्र पूर्ववत सुरू ठेवण्याचे आदेश दिल्याने पालक व विद्यार्थी यांनी समाधान व्यक्त केले आहे.



## कुंजीरवाडीतील साहेबराव सावंत यांचे निधन

**लोणी काळभोर, ता. १५ :** कुंजीरवाडी (ता. हवेली) येथील साहेबराव विठोबा सावंत (वय ८८) यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुलगे, एक मुलगी, सुना व नातवंडे असा मोठा परिवार आहे. मुंबईतील रबाळे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळकृष्ण सावंत यांचे ते वडील, तर कुंजीरवाडी येथील ग्रामीण सर्वांगीण विकास विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सुवर्णा सावंत यांचे ते सासरे होत.